




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २५६ ●सोमवार, दि. १५ डिसेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955









# शेतकऱ्यांची कर्जमाफी होणारच !

## पण फडणवीसांनी विधानसभेत ठेवली 'ही' अट

**नागपूर । प्रतिनिधी**

राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने मोठ्या प्रमाणावर आर्थिक सहाय्य थेट त्यांच्या बँक खात्यांत जमा केल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. हिवाळी अधिवेशनाच्या अंतिम आठवड्यात प्रस्तावावरील चर्चे दरम्यान बोलताना त्यांनी सांगितले की, आतापर्यंत सुमारे १५ हजार ७ कोटी रुपये थेट शेतकऱ्यांच्या खात्यांत वर्ग करण्यात आले असून, या मदतीचा लाभ सुमारे ९२ लाख शेतकऱ्यांना झाला आहे. अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या सिंचन विहिरींच्या दुरुस्तीसाठीही सरकारने मोठा निर्णय घेत २७ हजार विहिरींसाठी ८० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

३२ हजार कोटींचे विशेष मदत पॅकेज- मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, राज्य सरकारने यापूर्वीच ३२ हजार कोटी रुपयांचे विशेष मदत पॅकेज जाहीर केले होते. यामध्ये १० हजार कोटी रुपये पायाभूत सुविधांसाठी, २ हजार कोटी रुपये नरेगा अंतर्गत रोजगारनिर्मितीच्या कामांसाठी, तर उर्वरित रक्कम थेट शेतकऱ्यांना आर्थिक मदत म्हणून देण्याचे ठरवण्यात आले होते. या योजनेत तीन हेक्टरपर्यंतची मर्यादा ठेवण्यात आली होती. एनडीआरएफच्या निकषांनुसार मदत दिल्यानंतरही, रब्बी हंगामासाठी प्रति हेक्टर १० हजार रुपये अतिरिक्त मदत देण्याचा निर्णय सरकारने घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.

दोन जीआरद्वारे मदत; मोठा हिस्सा खात्यांत जमा- शेती पिकांच्या नुकसानीसाठी आणि बियाणे खरेदीसाठी शासनाने दोन स्वतंत्र शासन निर्णय (जीआर) काढले होते. यामध्ये एक जीआर १० हजार ५१६ कोटी रुपये, तर दुसरा ९ हजार ६११ कोटी रुपयांचा होता. या दोन्ही योजनांतील मोठा निधी थेट शेतकऱ्यांच्या खात्यांत जमा करण्यात आला असून, आतापर्यंत १५ हजार ७ कोटी रुपयांचे वितरण झाले असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले. काही ठिकाणी दहा हजार रुपयांची मदत मिळाली नाही, असे आरोप होत असले तरी प्रत्यक्षात ९१ ते ९२ लाख शेतकऱ्यांच्या खात्यांत ही रक्कम जमा झाल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

### ● पशुपालकांनाही मदत ; नरेगातून कामांना गती

**पशुधनहानी झालेल्या शेतकऱ्यांसाठीही सरकारने नुकसानभरपाई दिल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. नरेगा अंतर्गत ग्रामीण भागात विविध विकासकामे सुरू असून, अतिवृष्टीमुळे बुजलेल्या सिंचन विहिरी पुन्हा वापरात आणण्यासाठी प्रति विहीर ३० हजार रुपयांपर्यंत मदत देण्यात येत आहे. त्यानुसार २७ हजार विहिरींच्या दुरुस्तीसाठी ८० कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले आहेत.**

# १७ वर्षीय मुलीनं राहत्या घरी गळफास लावून केली आत्महत्या

**बीड । प्रतिनिधी**



अंभोरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खुंटेफळ (ता. आष्टी) येथे एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना घडली. या मुलीचे नाव पूजा असे असून, तिने नेमक्या कोणत्या कारणातून हे टोकाचे पाऊल उचलले, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. प्राप्त माहितीनुसार, आष्टी तालुक्यातील खुंटेफळ येथील रहिवासी असलेली १७ वर्षीय पूजा हिने शनिवारी सायंकाळच्या वेळी घरात कोणीही नसल्याचे पाहून गळफास घेतला. ही घटना घडल्यानंतर काही वेळातच तिचे आई-वडील घरी परतले. मुलीला गळफास घेतलेल्या अवस्थेत पाहताच, त्यांनी तात्काळ तिला खाली उतरवले आणि उपचारासाठी जवळच्या धानोरा येथील एका खासगी रुग्णालयात दाखल केले.

डॉक्टरांनी तपासून मृत घोषित- रुग्णालयातील डॉक्टरांनी पूजाची तपासणी केली असता, तिला मृत घोषित केले. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी कडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात हलवण्यात आला. यावेळी अंभोरा पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदार भगवान देवकर यांनी घटनेचा पंचनामा पूर्ण केला. शवविच्छेदन ▶ उर्वरित पान २ वर

# संतोष देशमुख हत्या प्रकरण, इलेक्ट्रॉनिक पुराव्यांवरून न्यायालयात जोरदार खडाजंगी

**बीड । प्रतिनिधी**



केज तालुक्यातील मस्साजोग येथील संतोष देशमुख हत्या प्रकरणाची शुक्रवारी सुनावणी झाली. सुनावणीप्रसंगी दोषारोप निश्चितीच्या वेळी बचाव पक्षाने तपासातील त्रुटींवर बोट ठेवले. बचाव पक्षाकडून केलेली मुदतवाढीची मागणी स्वीकारत विशेष न्या. पी. व्ही. पटवदकर यांनी आरोपनिश्चितीसाठी १९ डिसेंबरची तारीख दिली आहे. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाची सुनावणी बीड येथील जिल्हा न्यायालयातील विशेष मोक्का न्यायालयात पार पडत आहे. शुक्रवारी झालेल्या सुनावणीप्रसंगी फिर्यादी सुनील शिंदे यांनी दाखल केलेल्या गुन्ह्यात इलेक्ट्रॉनिक पुराव्यांवरून न्यायालयात सरकारी व बचाव ▶ उर्वरित पान २ वर

### ● पुढच्या तारखेला चार्ज फ्रेम

**कलम १९३, त्यातील पोट कलम ९ प्रमाणे आम्हाला डिशनल पुरावा देता येतो. या मुद्द्यावर बराच वेळ गेला. आमचे म्हणणे होते की, जो लॅपटॉप ते मागत आहेत, तो लॅपटॉप सध्या फॉरेन्सिक डिपार्टमेंटकडे आहे. सध्या आमच्या तो ताब्यात नाही. त्यामुळे आम्हाला तो देता येत नाही आणि त्याशिवाय आम्हाला दुसरा कुठला कागद द्यायचाही नाही. पुढच्या तारखेला चार्ज फ्रेम होईल. – बाळासाहेब कोल्हे, सहायक सरकारी वकील, बीड.**

## पदवीधर नोंदणीसाठी १८ डिसेंबर मुदत वाढ

**बीड । प्रतिनिधी**

(औरंगाबाद) विभागातील रहिवाशी असलेल्या पदवीधर मतदारांची नाव नोंदणी सुरू असून ज्यांची पदवी १ नोव्हेंबर २०२२ रोजी पूर्ण झाली आहे व ज्यांचे यापूर्वी मतदार म्हणून नाव होते त्या सवारनी नव्याने येत्या १८ डिसेंबर २०२५ पयरत ऑफलाईन किंवा ऑनलाईन पद्धतीने नाव नोंदणी करून लोकशाहीच्या प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन मातृभूमी प्रतिष्ठानचे तथा जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे यांनी केले आहे.

# बीड नगर परिषद निवडणूक निकालापूर्वीच अजित दादांनी केला वादा पुरा : विजयसिंह पंडित

## अल्पसंख्यांक बहुल भागात मोमीनपुरा, सय्यदअली नगर भागात कोट्यावधी रुपयांच्या विकास कामांना मंजुरी आ. विजयसिंह पंडित यांच्या पाठपुराव्या ला यश : शेख निजाम

**बीड । प्रतिनिधी**



बीड नगरपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने बीड नगर परिषदेच्या निवडणुकीच्या रणधुमाळी मध्ये अजित दादा यांनी मागील ३५ वर्षांमध्ये झालेला विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी मला फक्त पाच वर्षे संधी द्या असे आवाहन मतदारांना केले होते व मी कामाचा माणूस आहे जे बोलतो ते करतो याच उक्ती प्रमाणे अजित दादा पवार यांनी मोमीनपुरा भागातील अल्पसंख्यांक बहुल भागामध्ये विकास कामे करण्यासाठी अल्पसंख्यांक विकास योजनेतून कोट्यावधी रुपये मंजूर केलेले आहे त्यामुळे बीड शहरातील अल्पसंख्यांक बहुल भागाचा विकास व विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी मोमीनपुरा भागातील दायरा कब्रस्तान ते नसिब कटपीस पर्यंत सिमेंट रस्ता, सय्यदअलीनगर रस्ता, ▶ उर्वरित पान २ वर

# बीड जिल्ह्यात ११ नगरसेवक पदांसाठी ४३ उमेदवार रिंगणात

**बीड । प्रतिनिधी**



बीड जिल्ह्यातील बीड, परळी, माजलगाव, धारूर, गेवराई आणि अंबाजोगाई नगरपालिकांच्या निवडणुका मतदानाच्या दोन दिवस अगोदर निवडणूक आयोगाने बीड जिल्ह्यातील ११ नगरसेवक पदाच्या निवडणूका पुढे ढकलल्या होत्या. त्यासाठी २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. एकूण ११ जागेसाठी ४३ उमेदवार रिंगणात आहेत. प्रमुख पक्षामध्ये थेट लढती होणार असून प्रचारासाठी संपूर्ण पॅनल आणि कार्यकर्ते ताकतीने मैदानात उतरले आहेत. बीड १, परळी ४, धारूर १ आणि अंबाजोगाई ४ अशा ११ नगरसेवक पदाच्या जागेसाठी ४३ उमेदवार रिंगणात आहेत. ज्या कारणावरून ही निवडणूक पुढे ढकलली त्या पैकी बीड आणि धारूर मध्ये एकानेही माघार घेतली नाही. अंबाजोगाईत एकाने तर परळीमध्ये ५ जणांनी माघार घेतली. बीड नगर पालिकेत एकूण ५२ नगरसेवक निवडून येणार आहेत. २ डिसेंबर रोजी ५१ ▶ उर्वरित पान २ वर

# शेतकरी हक्क मोर्चासाठी वर्गणी करून येण्याचा वांगीकरांचा निर्धार : शेतकरी पुत्रांच्या गावागावात बैठकीस सुरुवात

**बीड । प्रतिनिधी**



कापूस व सोयाबीनला रास्त भाव मिळावा, यासह विविध प्रलंबित मागण्यांसाठी बीड येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य **शेतकरी हक्क मोर्चा**साठी गावागावात जनजागृती सुरू झाली आहे. हा मोर्चा दि. २५ डिसेंबर (गुरुवार) रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय दरम्यान काढण्यात येणार आहे. या मोर्चात जास्तीत जास्त शेतकऱ्यांचा सहभाग व्हावा, यासाठी दि. १४ डिसेंबर (रविवार) रोजी वांगी गावात शेतकऱ्यांची बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत वांगी गावातील शेतकरी, शेतकरी पुत्र व शेतकरी मित्रांनी लोकवर्गणी जमा करून बीड येथे मोर्चात सहभागी होण्याचा ठाम निर्धार व्यक्त केला. बैठकीत कापसाला १२ हजार रुपये, सोयाबीनला ७ हजार ▶ उर्वरित पान २ वर

# श्री एस. एम. देशमुख व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे ओ. एस. डी. श्री. मंगेश चिवटे यांचे हस्ते विधी सल्लागारपदी ॲड. श्रीराज शेळके यांची नियुक्ती

**बीड । प्रतिनिधी**



अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या विधी सल्लागार मंडळाच्या गेवराई तालुकाध्यक्ष पदी ॲड. श्रीराज शेळके यांना देवडी ता. वडवणी येथे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त मा श्री एस एम देशमुख व मा उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांचे विशेष कार्यकारी अधिकारी श्री मंगेशजी चिवटे यांच्या हस्ते विधी सल्लागार मंडळाच्या गेवराई तालुकाध्यक्ष पदी नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे गेवराई तालुक्यातील पत्रकारांना कायदेशीर मार्गदर्शन व तसेच पत्रकार परिषदेच्या नियमानुसार कायदेशीर बाबींवर सल्ला देणे ही महत्वाची ▶ उर्वरित पान २ वर

# काम फायनान्सचं, धंदा चोरीचा !

## बीड शहरात दुचाकी चोरीचा भन्नाट प्रकार उघड, मास्टरमाइंड जेरबंद, ८ गाड्या जप्त

**बीड । प्रतिनिधी**



बीड शहर आणि परिसरातील वाढत्या दुचाकी चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी बीड शहर पोलिसांनी केलेल्या विशेष कारवाईत एका मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश झाला आहे. या कारवाईत पोलिसांनी एका आरोपीला अटक करून त्याच्याकडून तब्बल आठ चोरीच्या दुचाकी जप्त केल्या आहेत. या प्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव कृष्णा उमेश अंतरकर वय २५, रा. शिवशक्ती नगर, पाथर्डी, जि. अहमदनगर असे आहे. प्राथमिक तपासात आरोपीची धक्कादायक पार्श्वभूमी उघड झाली आहे. आरोपी कृष्णा अंतरकर हा यापूर्वी एका फायनान्स कंपनीत कार्यरत होता. त्याचे काम हप्ते थकवलेल्या दुचाकी गाड्या ओढून आणण्याचे होते. याच कामातून त्याला वाहन उचलण्याचे चोरी करण्याचे कौशल्य आणि सवय लागली. फायनान्स कंपनीतील कौशल्याचा गैरवापर करत आरोपीने दुचाकी चोरी करण्यास सुरुवात केली. विशेष म्हणजे, चोरी केलेल्या या मोटारसायकली तो थेट पाथर्डी परिसरात विकत असे. ग्राहकांचा विश्वास संपादन करण्यासाठी आरोपी स्वतःला फायनान्स मध्ये काम करणारा अशी ओळख देत असे. या गाड्या हप्ते थकित असल्याने फायनान्स कंपनीकडून ओढून ▶ उर्वरित पान २ वर

# थर्टी फर्स्ट साठी गोव्याची दारू बीड मध्ये येताच पकडली

**बीड । प्रतिनिधी**

थर्टी फर्स्टच्या आधीच बीडच्या उत्पादन शुल्क विभागाचीवा राज्याची निर्मिती असलेल्या विविध विदेशी कंपन्यांची दारु राज्यात अवैधपणे विक्रीसाठी आणली जात होती. थर्टी फर्स्टसाठी ही दारु आणली जात होती. बीडच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाने दोन ठिकाणी कारवाई करुन दारु व वाहतूक करणारी वाहने असा २५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक विश्वजीत देशमुख यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली. माळवत्या वर्षाला निरोप देताना जंगी ▶ उर्वरित पान २ वर




# डिजिटल युगातील कामगाराचे स्वातंत्र्य : 'राईट टू डिस्कनेक्ट' विधेयक 2025 चा समाजशास्त्रीय मागोवा

आजचे जग झपाट्याने बदलत आहे. डिजिटल तंत्रज्ञानाने माणसाचे जीवन अधिक सुलभ, वेगवान आणि जोडलेले गेले आहे; परंतु याच तंत्रज्ञानाने काम आणि खासगी आयुष्य यांमधील सीमारेषा पुसट केली आहे. मोबाइल फोन, लॅपटॉप, ई-मेल, व्हॉट्सअ‍ॅप, व्हिडीओ कॉल, ऑनलाईन प्लॅटफॉर्म यांमुळे कामाची वेळ आता ठराविक कार्यालयीन तासांपुरती मर्यादित राहिलेली नाही. कार्यालय बंद झाले तरी काम मनातून सुटत नाही, सुट्टी असली तरी 'ऑनलाईन' राहण्याचा दबाव कायम असतो. याच पार्श्वभूमीवर 'राईट टू डिस्कनेक्ट' बिल २०२५ हे विधेयक अत्यंत महत्त्वाचे ठरते. हे विधेयक म्हणजे केवळ कर्मचाऱ्यांचा एक नवीन हक्क नाही, तर आधुनिक समाजाच्या कामकाज संस्कृतीवर पुनर्विचार करण्याची गरज अधोरेखित करणारा सामाजिक दस्तऐवज आहे

'राईट टू डिस्कनेक्ट' या संकल्पनेचा अर्थ साधा आहे की कामाचे ठराविक तास संपल्यानंतर कर्मचारी किंवा कामगार यांना कार्यालयीन ई-मेल, फोन कॉल, मेसेज, ऑनलाईन मीटिंग किंवा तत्सम डिजिटल संपर्कांपासून दूर राहण्याचा अधिकार असावा. म्हणजेच, कामाच्या वेळेनंतर कर्मचारी 'ऑफलाइन' राहू शकतो आणि त्यासाठी त्याच्यावर कोणताही अप्रत्यक्ष दबाव, शिक्षा किंवा नकारात्मक मूल्यांकन होऊ नये. आजच्या काळात अनेक कर्मचारी शारीरिकदृष्ट्या कार्यालयाबाहेर असतात, पण मानसिकदृष्ट्या सतत कामाशी जोडलेले असतात. हा सततचा मानसिक ताण, उपलब्ध राहण्याची अपेक्षा आणि तत्काळ प्रतिसाद देण्याची सक्ती हळूहळू व्यक्तीच्या मानसिक आरोग्यावर, कौटुंबिक जीवनावर आणि सामाजिक नातेसंबंधांवर गंभीर परिणाम करते. त्यामुळे 'राईट टू डिस्कनेक्ट' ही केवळ कामगार कायद्याची तरतूद नसून मानसिक आरोग्य, मानवी प्रतिष्ठा आणि सामाजिक संतुलनाशी जोडलेली मागणी आहे

समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिल्यास कामाचे स्वरूप हे नेहमीच सामाजिक रचनेशी जोडलेले राहिले आहे. औद्योगिक क्रांतीच्या काळात कामाची वेळ, कारखान्याचे तास, कामगारांचे श्रम हे स्पष्टपणे ठरवले गेले. पुढे कार्यालयीन संस्कृती आली तेव्हा 'नऊ ते पाच' ही वेळ समाजमान्य झाली. पण डिजिटल युगात ही चौकट मोडली आहे. 'वर्क फ्रॉम होम', 'हायब्रिड वर्क', 'फ्रीलान्सिंग', 'गिग इकॉनॉमी' यांसारख्या संकल्पनांनी काम अधिक लवचिक केले असले, तरी त्याच वेळी कामगारांचे संरक्षण कमकुवत झाले आहे. कर्मचारी कधीही, कुठूनही काम करू शकतो, ही सुविधा जितकी आकर्षक आहे, तितकीच ती शोषणाची शक्यता वाढवणारी आहे. कारण कामाची वेळ ठरलेली नसल्यामुळे कामगार कायम उपलब्ध राहील, अशी अपेक्षा निर्माण होते. 'राईट टू डिस्कनेक्ट' बिल या बदलत्या कामसंस्कृतीत कामगारांचे हक्क पुन्हा ठोसपणे अधोरेखित करते

या विधेयकाचा मुख्य उद्देश म्हणजे काम आणि वैयक्तिक आयुष्य यांमधील संतुलन पुन्हा प्रस्थापित करणे. आधुनिक समाजात व्यक्तीची ओळख केवळ तिच्या कामगिरीवर ठरवली जात आहे. कामाच्या बाहेरचे आयुष्य कुटुंब, विश्रांती, आरोग्य, सामाजिक सहभाग या गोष्टी दुय्यम ठरत चालल्या आहेत. समाजशास्त्र सांगते की जेव्हा व्यक्तीचे सामाजिक आयुष्य आकुंचन पावते, तेव्हा समाजात तणाव, नैराश्य, एकटेपणा आणि मानसिक आजार वाढतात. 'राईट टू डिस्कनेक्ट' हा हक्क व्यक्तीला तिचे आयुष्य केवळ कामापुरते मर्यादित न ठेवता पूर्ण मानव म्हणून जगण्याची मुभा देतो. काम हे जीवनाचा एक भाग आहे, संपूर्ण जीवन नाही हा संदेश या विधेयकातून अधोरेखित होतो.

या विधेयकात कामगार आणि नियोक्ता यांच्यातील नातेसंबंध नव्या पद्धतीने मांडलेले दिसतात. पारंपरिक अर्थाने नियोक्ता म्हणजे आदेश देणारा आणि कर्मचारी म्हणजे त्याचे पालन करणारा, अशी श्रेणीबद्ध रचना होती. परंतु आधुनिक लोकशाही समाजात कामगारांचे हक्क, प्रतिष्ठा आणि स्वायत्तता मान्य केली जाते. 'राईट टू डिस्कनेक्ट' बिल नियोक्त्यांनाही जबाबदार बनवते. कामाचे तास, आपत्कालीन परिस्थिती, डिजिटल संवादाचे नियम, कर्मचाऱ्यांच्या विश्रांतीचा कालावधी या सर्व बाबी स्पष्टपणे ठरवण्याची अपेक्षा या विधेयकातून व्यक्त होते. त्यामुळे कामाचे नियोजन अधिक शिस्तबद्ध आणि मानवीकेंद्रित होण्याची शक्यता निर्माण होते

महिलांच्या दृष्टीने या विधेयकाचे महत्त्व अधिक आहे. भारतीय समाजात महिलांवर घरकाम, मुलांची जबाबदारी, वृद्धांची काळजी आणि नोकरी असा दुहेरी किंवा तिहेरी भार असतो. 'वर्क फ्रॉम होम'च्या काळात अनेक महिलांना कार्यालयीन काम आणि घरगुती जबाबदाऱ्या एकाच वेळी सांभाळाव्या लागल्या आहेत. कामाची ठराविक वेळ नसल्यामुळे महिलांच्या विश्रांतीचा वेळ जवळजवळ नाहीसा झाला. 'राईट टू डिस्कनेक्ट' हक्क महिलांना मानसिक मोकळीक देऊ शकतो, कारण तो कामाच्या अपेक्षा मर्यादित करतो आणि वैयक्तिक वेळेचा सन्मान करतो. समाजशास्त्रीयदृष्ट्या हा हक्क लिंगसमतेच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरू शकतो

तरुण पिढीसाठीही हे विधेयक तितकेच महत्त्वाचे आहे. आजची तरुणाई स्पर्धात्मक वातावरणात काम करत आहे. सतत 'ऑनलाईन' राहणे, तत्काळ प्रतिसाद देणे, जास्त वेळ काम करणे हेच यशाचे मोजमाप बनले आहे. या दबावामुळे बर्नआउट, चिंता, नैराश्य, झोपेचे विकार यांचे प्रमाण वाढत आहे. समाजशास्त्रात याला 'डिजिटल थकवा' असे म्हटले जाते. 'राईट टू डिस्कनेक्ट' बिल तरुण पिढीला हे शिकवते की स्वतःची काळजी घेणे, विश्रांती घेणे आणि कामापासून दूर राहणे हे कमजोरी नाही, तर निरोगी जीवनाचे लक्षण आहे.

या विधेयकाचा प्रभाव केवळ वैयक्तिक पातळीवर मर्यादित राहत नाही, तर तो संपूर्ण समाजावर परिणाम करतो. जेव्हा कर्मचारी मानसिकदृष्ट्या तणावमुक्त असतो, तेव्हा तो अधिक सर्जनशील, उत्पादक आणि समाधानी असतो. याचा फायदा उद्योगांनाही होतो. कामगारांचे आरोग्य बिघडले, तर उत्पादकता घटते, अनुपस्थिती वाढते आणि सामाजिक आरोग्यव्यवस्थेवर ताण येतो. त्यामुळे 'राईट टू डिस्कनेक्ट' हा हक्क अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनेही दीर्घकालीनदृष्ट्या फायदेशीर ठरू शकतो.

समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिल्यास हे विधेयक आधुनिक भांडवलशाही व्यवस्थेतील अति-उत्पादन आणि अति-काम या प्रवृत्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करते. सतत काम, सतत उपलब्धता आणि कार्यक्षमतेची अतिरेकी अपेक्षा ही माणसाला यंत्रासारखे वागवते. 'राईट टू डिस्कनेक्ट' ही संकल्पना माणूस केंद्रस्थानी ठेवणाऱ्या विकासाच्या विचाराशी जोडलेली आहे. विकास म्हणजे केवळ आर्थिक आकडे नव्हेत, तर मानवी सुख, आरोग्य आणि सामाजिक नातेसंबंध यांचाही समावेश असावा, ही भूमिका या विधेयकातून अधोरेखित होते.

वर्तमानपत्राच्या माध्यमातून सर्वसामान्य लोकांपर्यंत या विधेयकाची माहिती पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. कारण अनेक कर्मचारी अजूनही हे मान्य करत नाहीत की कामाच्या वेळेनंतर 'नाही' म्हणणे हा त्यांचा हक्क आहे. समाजात ही जाणीव निर्माण झाली, तर कामसंस्कृतीत बदल घडू शकतो. कार्यालयीन ई-मेलला तात्काळ उत्तर देणे ही निष्ठा नसून, विश्रांतीचा सन्मान करणे ही खरी जबाबदारी आहे, असा दृष्टिकोन विकसित होणे गरजेचे आहे. 'राईट टू डिस्कनेक्ट' बिल हा बदल घडवून आणण्याचा प्रयत्न आहे.

शेवटी असे म्हणता येईल की 'राईट टू डिस्कनेक्ट' बिल २०२५ हे केवळ कायदेशीर तरतुदींचे संकलन नाही, तर आधुनिक समाजाला आरसा दाखवणारे विधेयक आहे. ते आपल्याला विचारायला भाग पाडते. आपण कामासाठी जगतो आहोत की जगण्यासाठी काम करतो आहोत? काम आणि आयुष्य यांच्यातील सीमारेषा पुन्हा स्पष्ट करणे, मानवी प्रतिष्ठेला प्राधान्य देणे आणि तंत्रज्ञानावर माणसाचे नियंत्रण प्रस्थापित करणे हा या विधेयकाचा गाभा आहे. समाजाने, उद्योगांनी आणि शासनाने मिळून हा विचार स्वीकारला, तरच 'राईट टू डिस्कनेक्ट' हा केवळ कायद्यातील शब्द न राहता प्रत्यक्ष जीवनातील अनुभव बनेल.

– डॉ. राजेंद्र बगाटे

◆ पान १ वरून पुढे...

## १७ वर्षीय मुलीनं...

रविवारी सकाळी करण्यात आले. यानंतर शोकाकुल आणि गंभीर वातावरणात पूजावर अंत्यसंस्कार करण्यात आले. आत्महत्येचे कारण अस्पष्ट- या घटनेमुळे खुंटेफळ गावात शोककळा पसरली आहे. पूजा ही अल्पवयीन होती आणि तिने इतके टोकाचे पाऊल का उचलले, यामागचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही. याचा पुढील तपास अंभोरा पोलीस हे करत आहेत.

शॉर्टसर्किटमुळे घरगुती साहित्य जळून खाक- बीड तालुक्यातील बाभळवाडी येथील रहिवासी महेश गोकूळ फिरंगे यांच्या घरात अचानक शॉर्टसर्किट झाल्याने मोठी दुर्घटना घडली. या आगीत घरातील कापूस, सर्व कपडे, दागिने तसेच धान्य आदी साहित्य मोठ्या प्रमाणावर जळून खाक झाले आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी आर्थिक नुकसान मात्र मोठ्या प्रमाणात झाले आहे. आधीच घरची आर्थिक परिस्थिती बिकट असताना या आगीमुळे कुटुंबावर मोठे संकट कोसळले आहे. घरातील दैनंदिन वापराच्या वस्तूंसह साठवलेले धान्य आणि मौल्यवान दागिने जळून नष्ट झाल्याने कुटुंब अक्षरशः उघड्यावर आले आहे. या घटनेनंतर संबंधित कुटुंबीयांनी प्रशासनाकडे तातडीने पंचनामा करून आर्थिक मदत नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे.

## संतोष देशमुख....

पक्षात जोरदार खडाजंगी झाली. फिर्यादीने आपल्या पुरवणी जबाबात स्पष्ट म्हटले होते की, मोबाइलमधील व्हिडीओ आणि कॉल रेकॉर्डिंगचा डेटा पोलिसांना द्यावा लागेल म्हणून तो पेन ड्राइव्हमध्ये सेव्ह केला आणि मोबाइल फॉरमॅट केला. मात्र न्यायालयात युक्तिवाद करताना तपास यंत्रणेने सांगितले की, सदर गुन्ह्यातील लॅपटॉप फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठवला आहे. त्यावर बचाव पक्षाच्या वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, जर फिर्यादी स्वतः सांगत आहेत की, पुरावा पेन ड्राइव्हमध्ये घेतला आहे, तर पोलिसांनी तो जप्त का केला नाही? जर लॅपटॉप फॉरेन्सिकला पाठवला असेल आणि पेन ड्राइव्ह जप्तच नसेल, तर मूळ पुरावा नष्ट झाला आहे का? असा प्रश्न उपस्थित करत, जोपर्यंत हे स्पष्ट होत नाही तोपर्यंत आरोपींवर दोषारोप निश्चित करू नयेत, असा युक्तिवाद बचाव पक्षाने केला. सरकारी पक्षाने लॅपटॉप फॉरेन्सिक लॅबकडे असल्याचे सांगत सारवासारव करण्याचा प्रयत्न केला. या युक्तिवादामुळे पोलिस तपासातील हलगर्जीपणा समोर आला असून, पुढील सुनावणीकडे सर्वांचे

◆ पान १ वरून पुढे...

लक्ष लागले आहे. आरोपी पक्षाच्या वतीने अ‍ॅड. विकास खाडे, अ‍ॅड. दिग्विजय पाटील, अ‍ॅड. मोहन पाटील बाजू मांडत आहेत. दोन्ही पक्षांकडून युक्तिवाद- बचाव पक्ष जाणीवपूर्वक प्रकरण लांबवीत असल्याचे अभियोग पक्षाकडून सांगण्यात आले; तर अभियोग पक्ष सातत्याने नवे-नवे कागद समोर आणतो, ते बचाव पक्षाला दिले जात नाहीत, असा युक्तिवाद बचाव पक्षाने केला. सुरुवातीपासून टप्प्याटप्प्याने पुरावे म्हणून कागद जोडले जात आहेत. दोषारोपानंतर कितीतरी महिन्यांनी नवीन पुरावा समोर आणला जातो, हे नियमानुसार नसल्याची भूमिका घेतली. सुमारे तीन तासांच्या युक्तिवादानंतर न्यायालयाने दोषारोप निश्चितीसाठी १९ तारीख दिली आहे.

## बीड नगर परिषद....

मोहम्मदिया कॉलणी रस्ता, अबु हनिफा चौक ते बुस्टर पंप पर्यंत रस्ता, असे एकूण हया भागातील १० कामांना अल्पसंख्यांक विकास योजनेतून ५ कोटींहून अधिक अजितदादांनी मंजुर केले सदर कामे मंजूर करण्यासाठी व पाठपुरावा करुन आमदार विजयसिंह पंडित यांच्या मार्फत शेख निजाम यांनी अजित दादांकडे पाठपुरावा केला मा.अजित दादा यांनी मंजुरी देऊन अल्पसंख्यांक भागाच्या विकासाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मोठा निधी मंजूर केलेला असून टप्प्या टप्प्या ने हया भागातील मागील ३५ वर्षापासून प्रलंबित असणारे सर्व विकास कामे पालकमंत्री अजित दादा पवार, आ.विजयसिंह पंडित, जिल्हाध्यक्ष अँड.राजेश्वर चव्हाण,शेख मुजीब भाई यांच्या मार्गदर्शनात करुन घेऊ व येणाऱ्या काळात मा.आ विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखालील पालकमंत्री मा.अजितदादा पवार यांच्या सोबत अल्पसंख्यांक समाजातील सर्व घटकातील लोक उभे राहणार शहरात व बीड मतदारसंघात बदल घडवू असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष शेख निजाम जैनोद्दीन , शेख खय्युम इनामदार, मोमीन जुबेर, हाफिज अशपाक,शेख सत्तार इनामदार,बबलू गलधर,शेख इरफान, मोमीन जानी, यांनी म्हटले आहे

## बीड जिल्ह्यात ...

नगर सेवकांसाठी मतदान झाले. २० डिसेंबर रोजी बीड शहरातील वार्ड क्र. ३बची निवडणूक होत आहे. यासाठी ७३ मेदवार निवडणूकीच्या रिंगणात असून ६ हजार ९१७ मतदार आपला नगरसेवक निवडणार आहे.

परळी वैजनाथ नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी तीन प्रभागातील चार जागांसाठी १९ उमेदवार रिंगणात आहेत. प्रभाग ३ मधील दोन्ही जागा, प्रभाग ९ अ आणि प्रभाग १४ ब या जागांचा यात समावेश आहे. प्रभाग ३

◆ पान १ वरून पुढे...

अ मध्ये ४ उमेदवार, ३ब मध्ये ७ उमेदवार, ९ अमध्ये ४ उमेदवार आणि १४ ब मध्ये ४ उमेदवार रिंगणात आहेत. धारूर नगर पालिकेत १० वार्ड असून एकूण २० नगर सेवक निवडून येणार आहेत. त्यापैकी वार्ड क्र. १० अ ची निवडणूक पुढे ढकलली होती. पूर्वी जेवढे उमेदवार रिंगणात होते तेवढे कायम असून भाजपा-राष्ट्रवादीत फाईट होणार आहे. बीड ६ हजार ९१७ मतदार निवडणार आपला नगरसेवकनिवडणूकीच्या रिंगणात उतरवण्यात आले आहे. बीड प्रभाग क्र. ३ ब, अंबाजोगाई प्रभाग क्र. १ ब, ३ अ, ६अ, १०ब, परळी प्रभाग क्र. ३अ, अब, ९अ, ११ ब, १४ ब, धारूर प्रभाग क्र. १० अ या जागेसाठी २० डिसेंबरला मतदान होणार आहे. अंबाजोगाई येथे १२ उमेदवार, १८ हजार ४७८ मतदार बजावणार हक्क अंबाजोगाई नगर पालिकेच्या चार नगरसेवक पदासाठी निवडणूक होत आहे. त्यामध्ये वार्ड क्र. १ ब साठी २ उमेदवार मैदानात आहेत. तर ५ हजार १३० मतदार हक्क बजावणार आहेत. वार्ड क्र. ३ अ. साठी ३ उमेदवार रिंगणात आहेत. येथे ४ हजार ३८७ मतदार आहेत. वार्ड क्र. ६ अ साठी ३ उमेदवार रिंगणात असून ३५९६ मतदार तर वार्ड क्र. १० ब साठी ५३६५ मतदार हक्क बजावणार असून ४ उमेदवार रिंगणात आहेत.

## शेतकरी हक्क...

रुपये व तुरीला १२ हजार रुपये किमान हमीभाव मिळावा, सीसीआयकडून होणारी शेतकऱ्यांची अडवणूक तात्काळ थांबवावी, हमीभावापेक्षा कमी दराने खरेदी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच परदेशातून कापूस व सोयाबीन आयातीवर बंदी घालावी, या प्रमुख मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. शेतकरी हक्क मोर्चाच्या जागृतीसाठी शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, माजी सैनिक अशोक येडे, शेतकरी नेते गणेश नाईकवाडे, राजू गायके, सुहास जायभाये, अर्जुन सोनवणे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले. या वेळी वांगी गावातील रतन शेळके, प्रकाश हाडूळे, रामहरी हाडूळे, जीवन शेळके, दिनकर शेळके, महादेव शेळके, बालाभाऊ शेळके, बाळू हाडूळे, ज्ञानेश्वर हाडूळे, गोरख बोनुगुडे, हरभाऊ शेळके, रतन बाजगुडे, तुकाराम शेळके यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी, शेतकरी पुत्र व शेती मित्र उपस्थित होते.

## श्री एस. एम. देशमुख....

जबादारी असणार आहे. त्यांच्या या निवडी बद्दल गेवराई तालुक्यातील सर्व पत्रकार बांधव, विविध संस्थाचे पदाधिकारी आणि मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले असून, त्यांच्या भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

◆ पान १ वरून पुढे...

## काम फायनान्सचं....

आणलेल्या आहेत, अशी खात्री देऊन तो ग्राहकांना कमी किमतीत दुचाकी विकत होता. नागरिकांचे दुहेरी नुकसान- आरोपीच्या या फायनान्सच्या ओळखीवर विश्वास ठेवून अनेक नागरिकांनी ह्या गाड्या विकत घेतल्या. मात्र, बीड पोलिसांनी तपास केल्यावर त्या सर्व गाड्या चोरीच्या असल्याचे निष्पन्न झाले आणि त्या जप्त करण्यात आल्या. यामुळे संबंधित खरेदीदारांचे दुचाकी गमवण्यासोबतच दिलेले पैसेही गमवावे लागले, अशाप्रकारे नागरिकांचे दुहेरी आर्थिक नुकसान झाले आहे. आरोपी अटक, आठ दुचाकी जप्त- मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांचा छडा लावण्यासाठी बीड शहर पोलीस ठाण्याच्या अँड पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे तपास केला. याच प्रयत्नातून आरोपी कृष्णा अंतरकर याला अटक करण्यात आली आणि त्याच्याकडून विविध ठिकाणांहून चोरीस गेलेल्या आठ दुचाकी हस्तगत करण्यात आल्या. दुचाकी चोरीचे २४ गुन्हे उघड - या कारवाईमुळे शिवाजीनगर पोलीस ठाणे आणि बीड शहर पोलीस ठाणे हद्दीतील २४ मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस झाले आहेत.तरी या प्रकरणाचा तपास सुरू असून, आरोपीचा आणखी गुन्ह्यांमध्ये सहभाग सिद्ध होण्याची शक्यता आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांच्या मार्गदर्शनाखाली, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार यांच्या यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ यांच्या नेतृत्वाखालील पोलीस उपनिरीक्षक महेश जाधव, पोलीस अंमलदार गहिनीनाथ बावनकर, राम पवार, शेख, मंगेश शिंदे आणि शौकत शेख तसेच बीड शहर पोलीस ठाण्याच्या डिटेक्शन पथकातील इतर अधिकारी व अंमलदारांनी योगदान दिले.

## थर्टी फर्स्ट...

पार्ट्यांचे आयोजन केले जाते. यात दारूचा वापर होता. हे लक्षात घेऊन राज्य उत्पादन शुल्क विभाग सध्या अलर्ट मोडवर आहे. जिल्ह्यात नित्रुड शिवारात तेलगाव माजलगाव रोडवर पथकाने सापळा रचून कारवाई केली. यात गोवा राज्यातून आणलेली ९ बॉक्स दारु जप्त केली गेली. या कारवाईत एक कार व एक दुचाकीही जप्त केली. तर, दुसरी कारवाई केज शिवारात मोठ्या प्रमाणावर अवैध दारु जप्त केली. नववर्षाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून तपासणी व कारवाईसाठी ६ पथके तयार करण्यात आली आहेत. उत्पादन शुल्क विभागाने दोन्ही प्रकरणात गुन्हा नोंदवून एकूण ६ आरोपींना अटक केली. ३ वाहने जप्त केली.

◆ पान ४ वरून पुढे...

## कै.अण्णासाहेब पाटील...

महामंडळाच्या योजनांचा लाभ न मिळण्यामागे महामंडळाची वेबसाइट आणि पोर्टल बंद असणे हे मुख्य कारण असल्याचे समोर आले आहे. मागील काही महिन्यांपासून महामंडळाचे 'महास्वयम' (Mahaswayam) पोर्टल योग्य प्रकारे काम करत नसल्याच्या तक्रारी आहेत. वेबसाइट तांत्रिक अडचणींमुळे किंवा अपडेटच्या नावाखाली वारंवार बंद असल्याने ऑनलाइन अर्ज प्रक्रिया पूर्णपणे थांबली आहे. परिणामी, नवीन कर्जासाठी अर्ज करणे, कागदपत्रांची पूर्तता करणे आणि महत्त्वाचे म्हणजे व्याज परताव्याचे दावे दाखल करणे अशक्य झाले आहे. काही माध्यमांच्या माहितीनुसार, महामंडळाच्या योजनांमध्ये गैरमराठा लाभार्थ्यांनी कर्ज मिळवल्याच्या आणि एजंटमार्फत फसवणूक होत असल्याच्या तक्रारीनंतर पोर्टल अपडेट करण्याचे काम सुरू असल्याचा खुलासा महामंडळाकडून करण्यात आला होता. आंदोलनाचा तीव्र इशारा- विनोद आप्पा इंगोले आणि बापूसाहेब साळुंके यांनी शासनाला तातडीने महामंडळाचे कामकाज सुरळीत करण्याची मागणी केली आहे. त्यांनी दोन महिन्यांपासून बंद असलेला परतावा लवकरात लवकर चालू करण्याची आणि नवीन व्यवसायांसाठी एलओआय देणे पूर्ववत करण्याची मागणी केली आहे. जर शासनाने या मागणीकडे दुर्लक्ष केले आणि मराठा समाजातील तरुणांना न्याय दिला नाही, तर अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा पत्रकाद्वारे देण्यात आला आहे.

## लिंबागणेश येथे....

एका शेतकऱ्याचेही अनुदान ई-केवायसीअभावी रखडता कामा नये. केंद्र चालकांनी कामात तातडीने गती आणावी, अन्यथा संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही यावेळी मंडळ

◆ पान ४ वरून पुढे...

अधिकारी उज्वला राऊत यांनी दिला. अतिवृष्टीमुळे पीक नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी हे अनुदान अत्यंत महत्त्वाचे असून अनेक शेतकरी या मदतीवर पुढील हंगामाची तयारी अवलंबून असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले. मात्र ई-केवायसीसारख्या तांत्रिक अडचणींमुळे शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीपासून वंचित राहावे लागत असल्याची गंभीर बाब यावेळी समोर आली. या प्रशासनिक हालचालीमुळे लिंबागणेश परिसरातील शेतकऱ्यांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले असून, लवकरच प्रलंबित ई-केवायसी पूर्ण होऊन अनुदान थेट खात्यावर जमा होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## फुलसांगवी शिवारात...

या कामांना आता बिबट्याच्या दहशतीची मोठी खेळ बसली आहे. शिरूर कासार तालुक्यामध्ये बिबट्याच्या दहशतीने शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी घराबाहेर पडणे मोठे धास्तीचे झाले आहे. शिरूर तालुक्यातील फुलसांगवी या गावांमध्ये शिवारामध्ये सुभाष भुजंगराव ढाकणे या फुलसांगवी मार्कडवाडी रस्त्या लगतच्या शेतकऱ्याच्या १६३ मधील शेतामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील बिगवण येथील मेंढपाळांनी मेंढ्यांचा कळप बसवलेला होता. याच ठिकाणी त्यांनी आपली जागलही ठेवली होती. रात्री एक ते दीड च्या दरम्यान या मेंढपाळाच्या जागली वरती बिबट्याने हल्ला चढवून येथील या मेंढपाळाच्या सामानाची वाहतूक करणाऱ्या घोड्याची व एका मेंढीची शिकार केली आहे. घोड्याच्या नरड्याचा चावा घेऊन त्याला गतप्राणी केले व त्याचे पोटाजवळील मांस भक्षण करून त्या ठिकाणाहून बिबट्या पसार झाला असल्याचे सांगितले आहे. सदरील घटनेची माहिती पाटोदा वन विभागाला दिल्यानंतर वन विभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल होऊन या घटनेचा पंचनामा केला आहे. या घटनेमध्ये सुमारे सत्तर ते पंच्याहत्तर हजार रुपये हजार रुपये किमतीचा घोडा व पंधरा ते वीस हजार रुपये किमतीची मेंढी असा सुमारे एक लाख रुपये किमतीची

◆ पान ४ वरून पुढे...

पशुधन बिबट्याच्या भक्षस्थानी ठरले आहेत. सदरील घटना फुलसांगवी परिसरामध्ये पहिल्यांदाच घडत असल्याने बिबट्याच्या दहशतीने परिसरातील शेतकरी वर्ग पुरताच हादरून गेला आहे. खरीप हंगामातील शेती कामालाही मोठी खिळ बसली आहे. या बिबट्याच्या लवकरात लवकर बंदोबस्त करावा आणि शेतकऱ्याला वन विभागाने भयमुक्त करावे अशी शेतकऱ्यातून मागणी जोर धरत आहे.

## भोगलवाडी सर्कलमध्ये...

डांबरीकरण, बोडखा व कासारी पेयजल योजना अशा अनेक योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. आज भोगलवाडी सर्कलमधील प्रत्येक ग्रामस्थ मीराताईंच्या विकासदृष्टीला आणि लोकाभिमुख नेतृत्वाला मान्यता देत आहेत. गावोगावी जनतेमध्ये त्यांच्याबद्दल उत्साहाचे वातावरण असून, विकास करणाऱ्यांना पुन्हा संधी द्या! असा नारा सर्वत्र घुमू लागला आहे. भोगलवाडी सर्कलमध्ये विविध सामाजिक, शैक्षणिक आणि पायाभूत योजनांची सांगड घालून महिलांच्या नेतृत्वातून विकास साधणाऱ्या मीराताई गांधले या या वेळेस जिल्हा परिषद निवडणुकीसाठी जनतेच्या फिक्स पसंतीच्या उमेदवार म्हणून उदयास येत आहेत

## दिवंगत लोकनेते...

किर्तन संपन्न झाले .दुपारी १ नंतर महाप्रसाद व सायंकाळी ६ ते १० भव्य मिरवणूक सोहळा पार पडला. यावेळी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक धार्मिक, या क्षेत्रातील मान्यवरासह शेतकरी बांधव, महिला मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्या होत्या. लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब प्रतिष्ठान कऱ्हेवडगाव यांनी जयंतीचे आयोजन केले होते.

## दिंद्रुड येथे डॉ....

शेतकऱ्यांचे कैवारी असलेल्या पणन मंत्री ना. जयकुमार रावल यांनी हे

◆ पान ४ वरून पुढे...

केंद्र सुरू करण्यासाठी परवानगी दिल्याबद्दल डॉ.शेटे यांनी त्यांचे आभार मानले. तसेच मतदार संघात आणखी काही खरेदी केंद्र सुरू करण्याची आपण मंत्री महोदयाकडे मागणी केली असल्याचेही ते म्हणाले.

यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव ढाकणे, देवदूत प्रतिष्ठान चे अध्यक्ष बंडू खांडेकर, शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ नेते सुभाष मायकर, प्रतिष्ठित व्यापारी नानासाहेब जैन, वैजनाथ काशीद ,कैलास ठोंबरे, प्रदीप ठोंबरे, अतुल चव्हाण, सतीश मायकर , नित्रुडचे प्रगतशील शेतकरी ड. सतीश बोरचाटे आदी मान्यवर उपस्थित होते. वजनकाट्यावर प्रत्यक्ष मोजणी करून खादीचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी शेतकऱ्याचा सत्कार करून त्यांना मान्यवरांच्या हस्ते पावती देण्यात आली. यावेळी बोलताना डॉ. ओमप्रकाश शेटे म्हणाले की, सोयाबीन, मूग व उडीद विक्रीसाठी हमीभाव खरेदी सेवा केंद्र सुरू करावे अशी मागणी शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात आली होती. अनेकांनी प्रत्यक्ष भेटून तर काहींनी फोनवरून माझ्याकडे आग्रह धरला होता. या अनुषंगाने आपण मुंबई येथे पणन मंत्री ना. जयकुमार रावल यांना प्रत्यक्ष भेटून माजलगाव मतदार संघामध्ये सोयाबीन हमीभाव खरेदी सेवा केंद्र सुरू करावे अशी विनंती त्यांना केली. मंत्री महोदयांनी ताबडतोब दिंद्रुड येथील श्री पांडुरंग ॲग्रो फॉर्म प्रोड्यूसर कंपनीला शासकीय हमीभाव सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यास परवानगी दिली आहे. शेतकऱ्यांनी नोंदणी करून आपले सोयाबीन, मूग व उडीद या ठिकाणी हमीभावाने विक्री करावेत. त्याचबरोबर मतदारसंघात महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने आणखी सोयाबीन खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत आपण हिवाळी अधिवेशन दरम्यान नागपूर येथे परत मंत्री महोदयांनी भेट घेऊन आणखी काही सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्र सुरू करण्याची त्यांच्याकडे विनंती केली. याबाबत लवकरच कार्यवाही करण्यात येईल असा शब्द त्यांनी दिला आहे. त्यामुळे आणखी खरेदी केंद्र सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याचेही डॉ.शेटे म्हणाले. सूत्रसंचालन किशोर ठोंबरे यांनी तर आभार प्रताप काशिद यांनी मानले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# 2034च्या फुटबॉल विश्वचषकासाठी 'प्रोजेक्ट महादेवा' मधून गुणवान खेळाडू मिळतील : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जागतिक फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी यांच्या हस्ते प्रोजेक्ट महादेवा'चा शुभारंभ







### ●लिओनोल मेस्सी या नावाचा वानखेडे स्टेडियमवर जल्लोष

**जागतिक फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीने फुटबॉल प्रेमींना फुटबॉल प्रेक्षकांकडे भिरकवताच प्रेक्षकांनी लिओनोल मेस्सी या नावाचा जल्लोष केला. संपूर्ण मैदान मेस्सीच्या नावाने दुमदुमत होते. या वेळेला जागतिक फुटबॉलपटू लिओनल मेस्सीला सचिन तेंडुलकर यांच्या नावाची दहा नंबरची जर्सी सचिन तेंडुलकर यांनी भेट केली. जागतिक फुटबॉलपटू लिओनाल मेस्सीनेही सचिन तेंडुलकर याला फुटबॉल भेट दिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जागतिक फुटबॉलपटू लिओनोल मेस्सी यांनी जर्सी भेट दिली. पार्थ जिंदाल, वेदना जिंदाल यांनी जिंदाल ग्रुपतर्फे व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन फाउंडेशन मार्फत ७५ लाख रुपयांचा चेक प्रोजेक्ट महादेवाला दिला. महिंद्रा अँड महिंद्रा कंपनी तर्फे व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन फाउंडेशन मार्फत ९९ लाख ९९ हजार रुपयांचा धनादेश प्रोजेक्ट महादेवाला दिला.**

### महाराष्ट्रातून निवडलेल्या १३ वर्षाखालील ६० फुटबॉलपटूंना विशेष प्रशिक्षण शिबिर व मार्गदर्शन

**मुंबई । प्रतिनिधी**

मिशन ऑलिम्पिक २०२६ अंतर्गत महाराष्ट्रातून अधिकाधिक सुवर्णपदके मिळवणे आणि २०३४ पर्यंत फुटबॉल विश्वचषकासाठी तयारीचे लक्ष्य ठेवून 'प्रोजेक्ट महादेवा' राबवण्यात येत आहे.या प्रोजेक्टमधून नक्कीच गुणवान खेळाडू मिळतील,अशी आशा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र शासनातर्फे 'प्रोजेक्ट महादेवा' या राज्यस्तरीय क्रीडा उपक्रमाचा शुभारंभ आज वानखेडे स्टेडियम येथे करण्यात आला. 'प्रोजेक्ट महादेवा' हा उपक्रम महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन , व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन फाउंडेशन , वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन , सिडको आणि महाराष्ट्र शासनाचा क्रीडा विभाग या विविध संस्थांच्या विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. जागतिक फुटबॉलपट्टू लिओनेल मेस्सी, अर्जेंटीनचे माजी खेळाडू लुईस सुआरेझ आणि रॉड्रिगो डिपॉल, क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे, खासदार प्रफुल्ल पटेल, भारतरत्न सचिन तेंडुलकर, भारतीय लोकप्रिय फुटबॉलपटू सुनील छेत्री, भारतीय फुटबॉल संघाचा कर्णधार राहुल भेके, महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्राचे)चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण परदेशी, श्रीमती अमृता देवेंद्र फडणवीस, गोट टूर प्रमोटर सत्तादूर दत्ता, टायगर श्रॉफ, अजय देवगण, कार्तिक आर्यन, दिनों मोरिया, जिंदाल ग्रुपच्या पार्थ जिंदल, वेदना जिंदल यांनी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, 'प्रोजेक्ट महादेवा ' हा महाराष्ट्र शासनाचा महत्त्वाचा उपक्रम आहे, जो संपूर्ण राज्यात तरुण फुटबॉल मधील प्रतिभेचा (१३ वर्षांखालील) शोध घेवून फुटबॉल मधील उच्च दर्जाचे खेळाडू घडविण्यासाठी सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत शिष्यवृत्ती, परदेशी प्रशिक्षकांकडून जागतिक दर्जाचे प्रशिक्षण आणि सर्वांगीण विकासाची संधी दिली जाणार आहे. निवडलेल्या ६० खेळाडूंची (३० मुले, ३० मुली) पाच वर्षांची संपूर्ण निवासी शिष्यवृत्ती मिळणार आहे. तसेच अव्वल खेळाडू नक्कीच फिफा विश्वचषक मध्ये खेळतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

प्रेक्षकांच्या पाठिंब्याशिवाय आपण मोठे होऊ शकत नाही: सचिन तेंडुलकर- भारतरत्न सचिन तेंडुलकर म्हणाले की, जागतिक फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी आणि त्यांचे सहकारी भारतात आल्याबद्दल आणि तेही मुंबईत आल्याबद्दल सर्वांचे खूप खूप आभार मानतो. मुंबईकरांनी ज्या प्रकारे या तिघांचे स्वागत केले ते अत्यंत अविस्मरणीय आहे. मुंबई ही स्वप्नांची नगरी आहे आजचा क्षण हा अत्यंत अविस्मरणीय आहे. प्रेक्षकांच्या पाठिंब्याशिवाय आपण मोठे होऊ शकत नाही. आज मला वानखेडे स्टेडियमवर झालेल्या सन २०११ च्या क्रिकेटच्या विश्वचषकाची आठवण झाली. आजचा क्षण हा सुवर्ण अक्षराने लिहिला जाईल. खेळामध्ये खेळाडूंना चिकाटी जिद्द अत्यंत महत्त्वाचे आहे लिओनेल मेस्सी जागतिक दर्जाचा खेळाडू असून त्याच्यामध्ये संवेदनशीलता त्याच प्रकारे त्यांनी या खेळाडूला दिलेल्या उत्तेजन अत्यंत महत्त्वाचे आहे याबद्दल मी मेसेज आभार मानतो आणि मेसीला व त्याच्या कुटुंबांना आरोग्यमय शुभेच्छा देतो.

# ॲड. मंगेश ससाने यांच्या गाडीवर हल्ला करणाऱ्यांना तात्काळ अटक करा : ॲड. सुभाष राऊत

### ● भ्याड हल्ल्याचा समता परिषदेच्यावतीने जाहीर निषेध

**माजलगाव । प्रतिनिधी**



माजलगाववरून पुण्याला जात असताना ओबीसी आंदोलक ॲड. मंगेश ससाने यांच्या गाडीवर अज्ञातांनी केलेल्या दगडफेकीचा समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस सुभाष राऊत यांनी निषेध व्यक्त केला असूनअशा भ्याड हल्ल्यांनी समाजसेवेचा आणि न्यायाचा लढा थांबणार नाही. पोलिसांनी या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन दोषींचा तात्काळ शोध घेऊन अटक करावी व त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी देखील ॲड. सुभाष राऊत यांनी केली आहे.

दोन महिन्यापूर्वी ओबीसी आंदोलक पवन करवर यांच्यावर झालेल्या हल्ला प्रकरणाची माहिती घेण्यासाठी ॲड. मंगेश ससाने माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गेले होते. येथे पोलीस निरीक्षकांची भेट घेऊन धारूर मार्गे इंदापूर, पुण्याकडे जात असताना विसावा हॉटेलच्या पुढे दोन दुचाकीवरून आलेल्या तरुणांनी ॲड. मंगेश ससाने यांच्या गाडीवर मागील बाजूने दगडफेक केली. त्यानंतर गाडीचे दरवाजाचे काच फोडले. यावेळी ॲड. मंगेश ससाने यांनी गाडी पळवून थेट धारूर पोलीस ठाणे गाठले. या दगडफेकीच्या हल्ल्यामध्ये ॲड. मंगेश ससाने यांच्या डोक्याला काच लागल्याने किरकोळ जखम झाली. दगडफेकीचे गांभीर्य ओळखून त्यांनी तात्काळ पोलीस स्टेशन गाठल्याने पुढील अनर्थ टाळला असला तरी सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तीवर अशा प्रकारे हल्ला करणे अत्यंत निंदनीय आहे. या हल्ल्याचा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्यावतीने जाहीर निषेध करण्यात आला असून पोलिसांनी हल्लेखोर युवकांचा शोध घेऊन त्यांना तात्काळ अटक करावी व कठोर कायदेशीर कार्यवाही करावी अशी मागणी समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांनी केली आहे.



*माजलगाव लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि सुंदरनगर तेलगाव लिगल विभाग प्रमुख श्री अशोक पाटील हे दिं.१३/१२/२५ रोजी नियतवयोमानानुसार सेवेतुन सेवानिव्रत झाले.प्रसंगी शुभेच्छा देताना कार्यकारी संचालक श्री आर.सी.बडगुजर साहेब, सचिव सुरेश लगड,मार्केटिंग मॅनैजर बागवान,आय.टी.प्रमुख संजय मोटेगावकर,बळीराम निपटे,भारतराव शेळके,बळीराम नाईकवाडे,दिगाबंर विर आदि कर्मचारी*

## जीएसटीआर-३ बी कर विवरणपत्र भरण्यासाठी शनिवारपर्यंत विशेष मोहीम

**परभणी । प्रतिनिधी**

राज्य वस्तू व सेवाकर विभाग, छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभागांतर्गत आठही जिल्ह्यांमध्ये जीएसटीआर-३ बी कर विवरणपत्र दाखल करण्यासाठी येत्या शनिवारपर्यंत (२० डिसेंबर) विशेष मोहीम राबविण्यात येत आहे, अशी माहिती विभागाकडून देण्यात आली आहे. वस्तू व सेवाकर कायद्यानुसार नोंदणीकृत करदात्यांनी दर महिन्याच्या २० तारखेपर्यंत मासिक जीएसटी ३ बी कर विवरणपत्र दाखल करणे बंधनकारक आहे. काही करदात्यांची नोव्हेंबर २०२५ पर्यंतची विवरणपत्रे प्रलंबित असल्याने विशेष मोहिमेअंतर्गत दि. २० डिसेंबर २०२५ पर्यंत सर्व प्रलंबित विवरणपत्रे दाखल करण्याचे उद्दिष्ट विभागाने निश्चित केले आहे. जीएसटी ३ बी हे स्वयं-घोषित मासिक / तिमाही सारांश विवरणपत्र असून यामध्ये करदात्याचे करदायित्व, आरसीएम अंतर्गत दायित्व, उपलब्ध आवक कर वजावट यांची नोंद करणे आवश्यक आहे. या विवरणपत्राद्वारेच प्रत्यक्ष जीएसटी भरणा करण्यात येतो. जीएसटीआर ३ बी न भरल्यास जीएसटीएन प्रणालीद्वारे स्वयंचलित पद्धतीने दंड व व्याज आकारले जाते. तसेच शास्ती ५० हजार रुपयांपर्यंत आकारली जाऊ शकते, दोन किंवा अधिक विवरणपत्रे प्रलंबित असल्यास बँक खाते गोठवण्याची तरतूद, सहा विवरणपत्रे प्रलंबित असल्यास नोंदणी रद्द करण्याचे प्रावधान कायद्यात उपलब्ध आहे. त्यामुळे जीएसटीआर विवरणपत्र नियमितपणे दाखल करणे अत्यंत आवश्यक आहे. छत्रपती संभाजीनगर क्षेत्रातील जीएसटीआर-३ बी विवरणपत्र प्रलंबित आहे, असे सर्व जीएसटी नोंदणीकृत करदाते यांनी विशेष मोहीम कालावधीत तत्काळ विवरणपत्र दाखल करून पुढील कायदेशीर कारवाई टाळावी.

## त्र्यंबकेश्वरच्या साधुग्रामचा आराखडा सादर करावा:आयुक्त शेखर सिंह

**नाशिक । प्रतिनिधी**

आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वर येथील नियोजित साधुग्राम, गोदावरी नदीवरील घाट आणि डीपी रस्ता आणि त्याला जोडणाऱ्या जोड रस्त्यांचा आराखडा तत्काळ सादर करावा, असे निर्देश नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी आज दिले.



सिंहस्थ कुंभमेळा अंतर्गत साधुग्राम व पायाभूत सोयी सुविधांची पाहणी व आढावा बैठक त्र्यंबकेश्वर नगरपरिषदेच्या सभागृहात पार पडली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील, उपविभागीय अधिकारी पवन दत्ता, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल पाटील, तहसीलदार गणेश जाधव, त्र्यंबकेश्वर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी राहुल पाटील आदी उपस्थित होते. आयुक्त सिंह म्हणाले की, नाशिक त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या कुंभमेळ्याच्या माध्यमातून त्र्यंबकेश्वर शहर आणि परिसरातील पायाभूत सोयीसुविधांना प्राधान्य देण्यात येणार आहे. आगामी काळात भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन पाणीपुरवठ्याचे नियोजन करून आराखडा तयार करावा. गोदावरी, अहिल्या, गौतमी नदीच्या स्वच्छतेबरोबर बारमाही प्रवाहित करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे नियोजन करावे.याबरोबर विकास कामांना गती द्यावी. त्र्यंबकेश्वर परिसरातील सर्व नद्या, तलाव यांची स्वच्छता करून सौंदर्यीकरण करावे. तलावांमधील गाळ काढण्यासाठी आराखडा तयार करावा. ठिकठिकाणी वृक्षारोपण करून परिसर हरित करण्यासाठी नगरपरिषदेने कार्यवाही करावी.

## गुरुकुल पब्लिक स्कूलचा खेळाडू पृथ्वीराज गिरीची नेट बॉलच्या शालेय राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**बीड । प्रतिनिधी**

संगमनेर येथे नेट बॉलच्या १७ वर्षा खालील मुले व मुली राज्यस्तरीय स्पर्धा संपन्न झाल्या या राज्यस्तरीय स्पर्धा क्रीडा युवा सेवा संचनालय महाराष्ट्र राज्य पुणे व अहिल्यानगर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आल्या. या स्पर्धे च्या ठिकाणी घेण्यात आलेल्या राज्यस्तर निवडचाचणी मध्ये गुरुकुल पब्लिक स्कूल चा खेळाडू पृथ्वीराज गिरी यांनी अत्यंत उत्कृष्ट कामगिरी करत महाराष्ट्र नेटबॉल संघामध्ये आपले स्थान निश्चित केले. पृथ्वीराज गिरी हा खेळाडू मागील तीन वर्षापासून नेट बॉलचे प्रशिक्षण जिल्हा क्रीडा संकुल बीड येथील मैदानावर घेत आहे. यापूर्वी पृथ्वीराज गिरी ने तीन राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये व चेन्नई येथे झालेल्या सब ज्युनिअर नेट बॉल च्या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले आहे. आता या नेट बॉल च्या राष्ट्रीय राष्ट्रीय स्पर्धा राजस्थान येथे ८ ते ११ जानेवारी २०२६ दरम्यान होणार आहेत. या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये पृथ्वीराज गिरी हा गुरुकुल पब्लिक स्कूलचा खेळाडू महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे. ज्या खेळाडूला गुरुकुल इंग्लिश स्कूलचे क्रीडा प्रशिक्षक रोहित ढवळे व मीरा काशीद यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल गुरुकुल इंग्लिश स्कूलच्या अध्यक्षा डॉ. विनिता ढाकणे, सचिव डॉ. राजेंद्र ढाकणे, कार्यकारी संचालक अखिलेश ढाकणे प्राचार्य ऋतुजा गाडीवान, उपप्राचार्य, क्रीडा प्रशिक्षक रोहित ढवळे, मीरा काशीद तसेच अन्य प्रशिक्षक व पालकांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले



## पीएम यशस्वी शिष्यवृत्तीसाठी अर्ज एनएसपी पोर्टलवर भरण्याचे आवाहन

**परभणी । प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पीएम यशस्वी प्रि-मॅट्रीक व पोस्ट-मॅट्रीक शिष्यवृत्ती योजनेसाठी इयत्ता ९ वी व १० वी मध्ये शिक्षण घेत असलेले इतर मागास प्रवर्ग व विमुक्त जाती प्रवर्गातील (विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग) या प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलवर भरावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक रामेश्वर मुंडे यांनी केले आहे. योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी जिल्ह्यातील माध्यमिक शाळेतील योजनेसाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांनी शिष्यवर्तीचे ऑनलाईन अर्ज दि. ३० जानेवारी, २०२६ या अंतिम मुदतीपूर्वी संबंधित कागदपत्रांसह राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलवर भरावेत, असेही प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# राजेंद्र आबा वाळके यांना मराठा सेवा संघाचा तानुबाई बिरजे, राज्यस्तरीय जिजाऊ माँसाहेब आदर्श पुरस्कार जाहीर

**आष्टी । प्रतिनिधी**



तालुक्यातील लोणी स.येथील सामाजिक कार्यकर्ते तथा प्रेस फोटोग्राफी पत्रकार श्री.राजेंद्र आबा वाळके यांना मराठा सेवा संघ प्रणित तानुबाई बिरजे, माँसाहेब जिजाऊ पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे अशी माहिती ज्येष्ठ पत्रकार श्री. सिताराम पोकळे यांनी दिली आहे.

आष्टी तालुक्यातील लोणी स.येथील राष्ट्रपती आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त श्री. सोमनाथ वाळके सर यांचे ज्येष्ठ बंधू राजेंद्र आबा वाळके हे जवळपास वीस वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रामध्ये वेगवेगळ्या दैनिकासाठी फोटोग्राफी बरोबरच वार्तांकन करत आहेत. रस्ते,पाणी, वीज या ग्रामीण भागातील मूलभूत सुविधा नागरिकांना मिळाव्यात म्हणून वेळोवेळी सोशल मीडिया आणि वर्तमानपत्रांच्या माध्यमातून राजेंद्र आबा हे आवाज उठवत असतात. गावातील सर्व धार्मिक, सामाजिक, परमार्थिक क्षेत्रामध्ये त्यांचा हिरीरीने सहभाग असतो. शंभुराजे सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून जिल्हा परिषद माध्यमिक विद्यालय लोणी या शाळेत विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबविलेले आहेत. गुणवंत विद्यार्थ्यांना वेळोवेळी सन्मानित केले आहे., सय्यदमीर बाबा विद्यालय,सर्व जिल्हा परिषद वस्तीशाळा आणि गावांतील अमरधाम स्मशानभूमी, जिल्हा परिषद माध्यमिक विद्यालय ,दशक्रिया विधी स्थळ याठिकाणी अनेक वृक्ष लागवड करून त्यांची जोपासना केली आहे.

त्याचप्रमाणे आपल्या लेखनिद्वारे त्यांनी अनेक कविता तसेच वेगवेगळी तीन नाटके लिहिली आहेत. त्या नाटकांचे जवळपास दहा प्रयोग सुद्धा ग्रामीण भागात झालेले आहेत. लोणी गावातील मंदिर,सभामंडप उभारणी साठी प्रयत्नशिल राहण्याबरोबरच रक्तदान शिबिराचे आयोजन, आरोग्य शिबीर तसेच परिसरातील सर्वच धार्मिक कार्यामध्ये त्यांचा हिरीरीने सहभाग असतो. बीड जिल्ह्यातील वर्तमानपत्रातून तसेच अहील्यानगर जिल्हयातील अनेक वर्तमान पत्रांमधून त्यांनी पत्रकारिता केलेली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन मराठा सेवा संघ प्रणित तानुबाई बिर्जे , मॉसाहेब जिजाऊ पुरस्कार त्यांना परिषदेच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार श्री.सिताराम पोकळे यांनी जाहीर केला आहे. पुरस्कार जाहीर झाल्यानंतर मराठा सेवा संघाचे आष्टी तालुका अध्यक्ष श्री. तानाजी बापू जंजीरे, मा. उपसभापती गोपाळ भाऊ रक्ताटे, रामदास महाराज रक्ताटे, ह भ प अभिजीत राजे निंबाळकर, ह भ प राऊत दादा, मा सरपंच बाजीराव वाळके, संतोष व्यवहारे,संजय धायगुडे, रामदास शेंडगे, ह भ प नारायण महाराज वाळके, संतोष तात्या वाळके,राजेंद्र दादा गावडे, पं. स. सदस्य डॉक्टर सुभाष वाळके ,पं. स. सदस्य प्राध्यापक झांजे सर ,राहुल सुरवसे, शिवाजी पाटील, रमेशजी ढगे,ज्येष्ठ नेते हनुमंतराव थोरवे साहेब, महेबुब जवान,देविदास आबा धस, माजी आमदार साहेबराव दरेकर नाना, जयसिंग गव्हाणे, सरपंच सावता सेट ससाने, दीव्यांग तालुका अध्यक्ष श्री.शिरीष भाऊ थोरवे, रवींद्र मोढवे पाटील,बीड जिल्हा रा. युवक काँ. उपाध्यक्ष धैर्यशील थोरवे, लेखक अजीनाथ सासवडे सर आदींनी शुभेच्छा दिल्या आहेत.

येत्या दि.२५.१२.२०२५ रोजी आष्टी येथे आयोजित भव्य सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे, या सन्मान सोहळ्यामध्ये राजेंद्र आबा वाळके यांच्याबरोबरच विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य केलेल्या अनेक व्यक्तींना सुद्धा नामवंतांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहेअशी माहिती तान्हुबाई बिरजे पत्रकार परिषदेच्या , मॉसाहेब जिजाऊ पुरस्कार समिती आयोजकांकडून केली आहे.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● सोमवार, दि. १५ डिसेंबर २०२५ ● पान ४

## बीड पंचायत समितीचा पदभार अनिरूध्द सानप यांच्याकडे



बीड । प्रतिनिधी

मग्रारोहयो अंतर्गत बीड तालुक्यामध्ये सन २०२३-२४ मधील डिलीट झालेले वर्ककोड लाभार्थ्यांकडून पैसे घेवून, नियमबाह्यपणे पुन्हा सन २०२५-२६ मध्ये काढल्याप्रकरणी गटविकास अधिकारी व सहाय्यक कार्यक्रम अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रवादीचे युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली होती. यानंतर दि.९ डिसेंबर रोजी वादग्रस्त गटविकास अधिकारी अशोक राठोड यांच्याकडील पदभार काढून त्याठिकाणी अनिरूध्द सानप यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## वाळू वाहतुकीवर पोलिसांची कारवाई



गेवराई । प्रतिनिधी

तालुक्यातील तपोनिमगाव शिवारात ट्रॅक्टरच्या साहाय्याने सुरू असलेल्या अवैध वाळू वाहतुकीवर तलवाडा पोलिसांनी धडक कारवाई करत तब्बल ६ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे शुक्रवार, दि. १२ रोजी ही कारवाई करण्यात आली असून संबंधित ट्रॅक्टर चालकाविरुद्ध तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बीड जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून अवैध वाळू उपसा व वाहतुकीविरोधात प्रशासनाने कडक भूमिका घेत कारवाईचा सपाटा लावला आहे. याच पार्श्वभूमीवर गेवराई तालुक्यातील तपोनिमगाव शिवारातील दत्त बाग परिसरात गोदावरी नदीपात्रातून ट्रॅक्टरच्या सहाय्याने वाळूची अवैध वाहतूक केली जात असल्याची गोपनीय माहिती तलवाडा पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी तत्काळ सापळा रचून कारवाई केली. या कारवाईत परमेश्वर भानुदास शिंदे (रा. तपोनिमगाव, ता. गेवराई, जि. बीड) याला ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी महिंद्रा कंपनीचा ७५७ मॉडेलचा लाल रंगाचा ट्रॅक्टर (क्र. एमएच २३ बी ७७९२) अंदाजे किंमत ५,००,००० रुपये, एक निळ्या रंगाची विना नंबरची लोखंडी ट्रॉली तसेच ट्रॉलीत भरलेली एक ब्रास वाळू अंदाजे किंमत १,०५,००० रुपये असा एकूण ६,०५,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी तलवाडा पोलीस ठाण्यात संबंधित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून अवैध वाळू वाहतुकीच्या साखळीचा शोध घेण्यासाठी पुढील तपास तलवाडा पोलीस करीत आहेत. या कारवाईमुळे अवैध वाळू वाहतूकदारांमध्ये खळबळ उडाली असून परिसरात कायद्याचा धाक निर्माण झाला आहे.

## नवरी मुलगी, आई-वडिल व लग्नात मध्यस्थी करणाऱ्या विरोधात गुन्हा दाखल




बीड । प्रतिनिधी

दहा लाख रुपये घेऊन लग्न केल्यानंतर अवघ्या दोन महिन्यांत नवरी मुलगी पसार झाली. माहेरी गेलेल्या मुलीला परत आणण्याचे प्रयत्न केले, मात्र तिने नकार दिला. पोलिसांत प्रकरण गेले, तक्रार निवारण केंद्रात समुपदेशन झाले तरीही मुलगी नांदायला आली नाही. अखेर या प्रकरणात ३ वर्षांनंतर नवरी मुलगी, तिचे आई-वडिल व लग्नात मध्यस्थी करणाऱ्या विरोधात गुन्हा नोंदवला गेला. बीड शहरात वास्तव्यास एका तरुणाचे लग्न होत नव्हते. त्याला त्याच्या एका नातेवाईकाने १५ लाख रुपये दिल्यास एक मुलगी लग्नासाठी असल्याचे सांगितले. त्याने होकार दिला. सुरुवातीला पाच लाख रुपये दिले. त्यानंतर लग्न पार पडले. लग्नावेळी पाच लाख रुपये दिले. असे एकूण १० लाख रुपये देण्यात आले. यानंतर २ महिन्यांनी नवरी घरातील काही दागीने घेऊन पसार झाली. सुरुवातीला ती मोहरी नसल्याचे सांगितले गेले. त्यामुळे बीड शहर पोलिसांत मिसींगची नोंद केली गेली. काही दिवसांनी ती मोहरी असल्याची माहिती मिळाल्याने शहर पोलिस व मुलाचे कुटुंबिय बुलढाणा जिल्ह्यात मुलीच्या गावी गेले. तिथे मुलीने नांदायला यायला नकार दिला. यानंतर पोलिसांनी मिसिंग अर्ज निकाली काढला. मुलाने बीडच्या तक्रार निवारण केंद्रात अर्ज केला. तिथेही मुलीने नांदायला यायला नकार दिला. दरम्यानच्या काळात मुलाकडे लग्नातील राहिलेले ५ लाख रुपये देण्याची मागणी झाली. ५ लाख दिल्यास मुलगी नांदायला येईल असे सांगितले. मात्र मुलाने मुलगी नांदत नसल्याने १० लाख परत द्या अशी मागणी केली. या प्रकरणात मुलाच्या तक्रारीवरुन गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# कै.अण्णासाहेब पाटील महामंडळाचा परतावा थांबला, मराठा महासंघाचा आंदोलनाचा इशारा!

बीड । प्रतिनिधी

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या ( योजनांमधून कर्ज घेतलेल्या मराठा समाजातील लाभार्थ्यांचा व्याज परतावा (Interest Refund) मागील दोन महिन्यांपासून थांबला असून, त्याचबरोबर नवीन व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी प्राथमिक मंजुरी पत्र (LOI - Letter of Intent) मिळत नसल्याने मराठवाड्यातील तरुणांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. या समस्येवर तातडीने तोडगा न काढल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा अखिल भारतीय मराठा महासंघाने दिला आहे.

योजनेच्या लाभापासून तरुण वंचित- अखिल भारतीय मराठा महासंघाचे मराठवाडा सरचिटणीस विनोद आप्पा इंगोले आणि बीड जिल्हाध्यक्ष बापूसाहेब साळुंके यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे सरकारचे लक्ष वेधले आहे. त्यांनी म्हटले आहे की, व्याज परतावा थांबला:



महामंडळाच्या योजनेअंतर्गत कर्ज घेतलेल्या लाभार्थ्यांचे व्याजाचे हप्ते भरूनही परतावा मिळत नाहीये, ज्यामुळे त्यांच्या आर्थिक नियोजनावर मोठा परिणाम झाला आहे. नवीन व्यवसायांना खीळ: नवीन उद्योग-व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक असणारे 'एलओआय' (LOI) देणे महामंडळाकडून बंद करण्यात आले आहे. यामुळे बेरोजगार तरुण स्वयंरोजगाराच्या संधीपासून वंचित राहत आहेत. बेरोजगारीचा प्रश्न गंभीर: मराठवाड्यात आधीच बेरोजगारीचे प्रमाण जास्त आहे आणि सुशिक्षित तरुणांना मोलमजुरी करण्याची वेळ आली आहे. अशा परिस्थितीत, महामंडळाच्या योजना मराठा तरुणांसाठी एक 'नवीन आशा' ठरल्या होत्या, मात्र आता त्या बंद झाल्याने मोठे संकट उभे राहिले आहे. तांत्रिक अडचणी आणि वेबसाइट बंद- अण्णासाहेब पाटील

► उर्वरित पान २ वर

## लिंबागणेश येथे अतिवृष्टी अनुदानाच्या ई-केवायसीचा सखोल आढावा

### सेवा केंद्र चालकांना प्रलंबित ई-केवायसी तातडीने पूर्ण करण्याच्या सक्त सूचना

लिंबागणेश । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यात काही महिन्यांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर पीक नुकसान झाले होते. या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांना शासनामार्फत आर्थिक मदत म्हणून अनुदान मंजूर करण्यात आले आहे. हे अनुदान जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात येणार असून, यासाठी ई-केवायसी प्रक्रिया अनिवार्य आहे. मात्र अद्याप अनेक शेतकऱ्यांची ई-केवायसी प्रलंबित असल्याने त्यांचे अनुदान शासनाकडेच अडकून पडले आहे.



या पार्श्वभूमीवर दि. १४ डिसेंबर रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी उज्वला राऊत यांनी प्रत्यक्ष गावात भेट देत अतिवृष्टी अनुदानाच्या ई-केवायसी प्रक्रियेचा सखोल आढावा घेतला.

यावेळी तलाठी गणपत पोतदार, राजेंद्र शेलकर, तलाठी अक्षय शिंदे, तलाठी नारायण दराडे, महसूल सेवक, पत्रकार हरिओम क्षीरसागर तसेच सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे उपस्थित होते. मंडळ अधिकारी उज्वला राऊत यांनी लिंबागणेश येथील सर्व शासकीय व खासगी सेवा केंद्रांना प्रत्यक्ष भेटी देऊन केंद्र चालकांशी संवाद साधला. अनेक शेतकऱ्यांची ई-केवायसी अद्याप प्रलंबित असल्याबाबत त्यांनी नाराजी व्यक्त केली. शेतकऱ्यांचे अनुदान वेळेत मिळावे, यासाठी प्रलंबित सर्व ई-केवायसी तातडीने पूर्ण करून शासनाच्या पोर्टलवर अपलोड करण्याच्या सक्त सूचना त्यांनी सेवा केंद्र चालकांना दिल्या.

► उर्वरित पान २ वर

## फुलसांगवी शिवारात बिबट्याने पाडला घोडा अन् मेंढीचा फाडशा




शिरूर । प्रतिनिधी

तालुक्यातील फुलसांगवी या गावाच्या शिवारामध्ये पश्चिम महाराष्ट्रातून आलेल्या मेंढपाळांच्या जागली वरती बिबट्याने हल्ला चढवून मेंढपाळाच्या घोड्याची मेंढीची शिकार केली आहे.बिबट्याच्या या हल्ल्यामुळे फुलसांगवी परिसरामध्ये मोठी दहशत निर्माण झाली आहे. शिरूर कासार तालुक्यातील मौजे फुलसांगवी या गावाच्या परिसरामध्ये रब्बी हंगामाची शेतीची कामे मोठ्या जोमाने चालू आहेत. एकीकडे शेतकऱ्यांना शेतातील कामे वेळेत करणे आव्हानात्मक झाले असताना ► उर्वरित पान २ वर

## भोगलवाडी सर्कलमध्ये विकासाचा आदर्श उभारणाऱ्या विकास भिमुख नेतृत्व असणाऱ्या मीराताई गांधले पुन्हा जिल्हा परिषदेसाठी सज्ज



**● सर्व लोकांच्या सुखदु:खामध्ये सातत्याने सहभागी होणाऱ्या अडीअडचणीला धावून येणाऱ्या भोगल वाडी गावचा विकास काय असतो हे बीड जिल्ह्याला दाखवून देणाऱ्या अशा कुशल विकास भिमुख नेतृत्व म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते अशा मिराताई गांधले पुन्हा जिल्हा जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी सज्ज झालेल्या आहेत त्यांना या भागातील सर्व मतदारांचा भक्कम पाठिंबा आहे व त्या बहुमताने रेकॉर्ड ब्रेक विजय होऊन पुन्हा विकासाची गंगा या परिसरामध्ये आणतील अशी अपेक्षाही या भागातील मतदारांकडून व्यक्त होत आहे**

बीड । प्रतिनिधी

भोगलवाडी सर्कलचा चेहरामोहरा बदलण्याचं श्रेय ज्यांना जातं त्या माजी जिल्हा परिषद अध्यक्ष मीराताई गांधले पुन्हा एकदा जनतेच्या सेवेसाठी सज्ज झाल्या आहेत. आपल्या कार्यकाळात त्यांनी भोगलवाडी सर्कलमध्ये कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांची उभारणी करून सशक्त आणि प्रगत ग्रामविकासाचं आदर्श उदाहरण निर्माण केलं आहे. मीराताईंच्या प्रयत्नातून भोगलवाडी ग्रामपंचायत सचिवालयासाठी तब्बल १ कोटींचा निधी, भोगलवाडी पेयजल योजनेसाठी १ कोटी रुपयांचा निधी, भोगलवाडी जिल्हा परिषद शाळेसाठी १० नवीन वर्ग खोल्यांचे बांधकाम, तसेच भोगलवाडी फाटा ते असोला मार्गाचे ► उर्वरित पान २ वर

## कै.चि. आकाश बापूसाहेब साळुंके याच्या जयंतीनिमित्त अन्नदान सेवा संपन्न

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील नामवंत उद्योजक बापूसाहेब साळुंके यांच्या कै.चि. आकाश बापूसाहेब साळुंके या चिमुकल्याच्या जयंतीनिमित्त साळुंखे परिवाराकडून काल बीड शहरातील स्नेहसावली बालघर रामनगर या ठिकाणी शालेय साहित्य वाटप व फळ वाटप व वृद्ध अनाथ आश्रम कळसंबर या ठिकाणी अन्नदानाची सेवा तसेच बीड बस स्टॅन्ड ते साठे चौक व जालना रोड यालगत राहणाऱ्या बेघर लोकांना उपदार कपड्यांचे व फळांचे वाटप या जयंतीच्या निमित्ताने यावेळी अखिल भारतीय मराठा महासंघाचे मराठवाडा सरचिटणीस विनोद आप्पा इंगोले



युवक जिल्हाध्यक्ष भागवत राव मस्के बीड जिल्हा उपाध्यक्ष परमेश्वर अवचट तालुका उपाध्यक्ष शिवाजी हिदुळे बीड शहर अध्यक्ष दत्ता शेळके पाटील घोडके आन्ना ईश्वर विशाल साळुंके परिवाराने केले होते. बापूसाहेब साळुंखे व साळुंखे परिवाराच्या वतीने कै.चि. आकाश बापूसाहेब साळुंखे याच्या जयंतीनिमित्त काल बीड शहरामध्ये विविध ठिकाणी अन्नदान सेवेचे आयोजन पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते करण्यात आले होते, तसेच या जयंतीनिमित्त त्यांनी बेघर लोकांना उपदार कपडे व फळ वाटप केलेले पाहायला मिळाले होते.

## दिवंगत लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांची ७६वी जयंती कऱ्हेवडगांवमध्ये उत्साह साजरी

**● १०३ दात्यांनी केले रक्तदान, किर्तन, महाप्रसाद, भव्य मिरवणूकने सोहळा संपन्न**



आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री, केंद्रीय ग्रामविकास मंत्री दिनदलित, गोर गरीब वंचित, ऊसतोड कामगार शोषित घटकांचा आवाज बनवून ज्यांनी अखेरच्या श्वासापर्यंत काम केले असे भाजप नेते दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांची १२ डिसेंबर रोजी ७६वी जयंती तालुक्यातील कऱ्हेवडगाव येथे विविध धार्मिक सामाजिक कार्यक्रमाने संपन्न झाली. लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेब प्रतिष्ठान कऱ्हेवडगांव तसेच ग्रामस्थांच्या वतीने मागील आठ दिवसांपासून जयंतीची तयारी करण्यात येत होती . तालुक्यातील कऱ्हेवडगांव येथे १२ डिसेंबर रोजी लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या७६व्या जयंतीनिमित्त सकाळी ९ वाजता विठ्ठल रुक्मिणी मंदिर सभागृहात प्रतिमेचे पूजन होऊन ९ ते १ यावेळेत भव्य रक्तदान शिबिर संपन्न झाले यामध्ये गावातील १०३ दात्यांनी रक्तदान केले, ह.भ.प. आजिनाथ महाराज लाड यांचे सकाळी १० ते १२ यावेळेत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या जिवनकार्यावर प्रकाश टाकणारे ► उर्वरित पान २ वर

## दिंद्रुड येथे डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या हस्ते शासकीय सोयाबीन खरेदी केंद्राचा शुभारंभ



दिंद्रुड । प्रतिनिधी

आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या हस्ते दिंद्रुड येथे सोयाबीन हमीभाव खरेदी सेवा केंद्र सुरू करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना या केंद्रावर महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने शासनाने निर्धारित केलेल्या दरामध्ये सोयाबीन, उडीद, मूग विक्री करता येईल. राज्याचे संवेदनशील, अभ्यासू व ► उर्वरित पान २ वर

**● शेतकऱ्यांनी सहकार्य करावे**

**सदरील सोयाबीन हमीभाव खरेदी सेवा केंद्र हे श्री पांडुरंग ॲग्रो फॉर्म प्रोड्यूसर कंपनीला मिळाले आहे. त्यामुळे इथे प्रामाणिकपणे शेतकऱ्यांचे हित जोपासले जाणार आहे. परंतु शेतकऱ्यांनी सोयाबीन विक्रीसाठी आणताना वाळवून, स्वच्छ व चांगल्या प्रतीचे आणावे. कारण नाफेड, पणन व सरकारने सोयाबीन खरेदीसाठी काही नियम व अटी घातल्या आहेत त्याचे सर्वांनी पालन करून सहकार्य करावे.- नागेश पांडुरंग ठोंबरे (अध्यक्ष, श्री पांडुरंग ॲग्रो फॉर्म प्रोड्यूसर कंपनी)**

## 'नाशिक पॅटर्न' बीडमध्ये राबवा; बॅनरवर झळकलेल्या चेहऱ्यावर थेट एफआयआरची मागणी

बीड । प्रतिनिधी

नाशिक शहरात अनधिकृत बॅनर व होर्डिंग्जविरोधात राबवण्यात आलेल्या कडक कारवाईमुळे होर्डिंग्जमुक्तीचा नाशिक पॅटर्न राज्यभर चर्चेचा विषय ठरला आहे. नाशिक शहर पोलिसांनी अवघ्या १० दिवसांत बॅनरवर झळकलेल्या व्यक्तींवर थेट एफआयआर दाखल करत २१ पेक्षा अधिक गुन्हे नोंदवले आहेत. याच धर्तीवर बीड शहरातही कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केली आहे.

बीड शहरात सध्या नेते व व्यावसायिकांकडून सर्रासपणे अनधिकृत बॅनर, कटआऊट्स व होर्डिंग्ज लावले जात असून त्यामुळे



शहराचे विद्रूपीकरण होत आहे. तसेच रस्त्यांवर अडथळे निर्माण होऊन अपघातांचा धोका वाढला आहे. मात्र नगरपालिका व पोलीस प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या प्रकाराला आळा बसत नसल्याचा आरोप डॉ. ढवळे यांनी केला आहे.

निवडणूक आचारसंहितेचे उल्लंघन, प्रशासन मौनात- नगरपालिका निवडणूक आचारसंहिता लागू झाल्यानंतर बीड नगरपालिकेने फक्त ३८ ठिकाणी बॅनर व कटआऊट्स लावण्याची परवानगी दिली होती. असे असतानाही शहरभर मोठ्या प्रमाणात अनधिकृत बॅनर लावण्यात आले. आचारसंहितेचे स्पष्ट उल्लंघन होऊनही नगरपरिषद प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई न केल्याने संशय व्यक्त केला जात आहे. न्यायालयीन आदेश केवळ कागदोपत्री? यापूर्वी न्यायालयाने राज्यातील सर्व महानगरपालिका व नगरपालिकांना शहर बॅनरमुक्त ठेवण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्यानुसार पालिकांकडून दरवर्षी शपथपत्र दाखल केले जाते. मात्र प्रत्यक्षात बॅनरमुक्ती केवळ कागदोपत्रीच असून, न्यायालयाची दिशाभूल केली जात असल्याचा गंभीर आरोप डॉ. ढवळे यांनी केला आहे. मुख्यमंत्र्यांपर्यंत निवेदन- या प्रकरणी जिल्हाधिकारी बीड, मुख्याधिकारी नगरपरिषद बीड व पोलीस अधीक्षक बीड यांच्यामार्फत मुख्यमंत्री, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे व पालकमंत्री अजितदादा पवार यांना लेखी निवेदन देण्यात आले आहे. बीड शहरात नाशिक पॅटर्नप्रमाणे बॅनरवर झळकलेल्या व्यक्तींवर थेट एफआयआर दाखल करून कडक कारवाई करावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.